सरकार –वि.–प्रकाश

MHBU080001652026

दाखल तारीखः– २३/०१/२०२६
नोंदणी तारीखः– २३/०१/२०२६
निर्णय तारीखः– १०/०८/२०२६
कालावधीः– **वर्ष महिने दिवस**
०० ०६ १८

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, नांदुरा, जि.बुलढाणा यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी– किरण वि. लुंगे)

**सं.फौ.प्रकरण क्र.– ८८/२०२६** **निशाणी क्र.०५ खाली**

| | | |
|---|---|---|
| **सरकारपक्ष** | : | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, नांदुरा, जि. बुलडाणा. |
| **सरकारपक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता** | : | **श्री.के.व्ही.गारमोडे साहेब** |
| | - विरुध्द - | |
| **आरोपी** | : | **प्रकाश भिमराव चव्हाण,**<br>वय – ४५ वर्ष, व्यवसाय – मजुरी<br>**रा. वडनेर भोलजी, ता.नांदुरा, जि. बुलडाणा.** |
| **आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ** | : | **श्री.डी.टी.राऊत साहेब** |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा तारीख | : | २०/१२/२०२५ |
| छापील प्रथम खबर तारीख | : | २०/१२/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | २३/०१/२०२६ |
| गुन्ह्याचा तपशील निश्चितीची तारीख | : | २३/०१/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | २३/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | : | १०/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १०/०८/२०२६ |
| शिक्षेची तारीख, लागु असल्यास | : | -- |

## आरोपीचा तपशिल

| आ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | दोषारोप ठेवण्यात आलेले कलम | निर्दोष मुक्त किंवा शिक्षा कसे | ठोठावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं.च्या कलम ४२८ च्या अन्वये खटल्याच्या दरम्यानचा तुरुंगवासात काढलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रकाश भिमराव चव्हाण | समजपत्रा वर सोडले | २३/०१/ २०२६ | महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा, १९४९ चे कलम ६५–ई प्रमाणे | निर्दोष मुक्त | –– | –– |

## सरकारपक्ष / बचावपक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकार पक्ष

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | चंद्रकांत दशरथ मुंढेकार | पंच साक्षीदार (नि.क्र.०५ खाली) |

### ब.बचाव पक्षाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## सरकार पक्ष / बचावपक्ष / न्यायालयीन निशाणी क्रमांक

### अ.सरकारपक्षः–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ०६ | पंच साक्षीदाराची पंचनाम्यावरील सही |

### ब.बचावपक्षः–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

### क.न्यायालयीन निशाणीः–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड.वस्तुः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक १०/०८/२०२६)

आरोपीविरुध्द सदर खटला महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा, १९४९, कलम ६५ (ई) अन्वये सिध्दतेकरीता चालविण्यात आला.

२) अभिलेखावरील उपलब्ध पुरावा याचे अवलोकन केले. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता सरकार पक्षातर्फे पंच साक्षीदार चंद्रकांत दशरथ मुंढेकार यांना तपासले.

३) मी गुन्हयाचा तपशील **नि.क्र.०५** अन्वये नोंदवुन तो आरोपीला त्याच्या भाषेत समजावुन सांगितला असता आरोपीने दोषारोप अमान्य करून संपरीक्षेची मागणी केली. आरोपी विरुध्द आरोप सिध्द करण्यासाठी सरकारपक्षातर्फे एका साक्षीदाराची साक्ष नोंदविली. तसेच आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ (१) (ब) अन्वये बयाण नोंदविण्यात आले नाही. मी दोन्ही बाजुच्या वकीलांनी केलेला युक्तीवाद ऐकला, सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराचा साक्षीपुरावा वाचला, तसेच न्यायालयीन अभिलेखात दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे न्यायनिर्णयासाठी उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे नमुद करीत आहे :–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | सरकार पक्ष सिध्द करतो काय की, दि.२०/१२/२०२५ रोजी १५:२२ वा.चे दरम्यान मौजे वडनेर भोलजी येथे सार्वजनिक ठिकाणी आरोपी हा त्याचे ताब्यात बेकायदेशीररित्या ०९ देशी दारु बॉटल बाळगतांना मिळुन आला आणि त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९, चे कलम ६५ (ई) नुसार गुन्हा केला? | **नाही.** |
| २ | काय आदेश ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र.१ करीताः</u> –**

४) पंच साक्षीदार चंद्रकांत दशरथ मुंढेकार **(स.सा.क्र.१)** याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.२०/१२/२०२५ रोजी पोलीसांनी त्याला मौजे वडनेर भोलजी येथे घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. पोलीसांनी त्याचे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नाही. अभिलेखावरील पंचनाम्यावरील त्याची सही त्याने ओळखली परंतु मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली. पुढे असे कथन केले की, ''असे काही घडले नव्हते की, दि.२०/१२/२०२५ रोजी पोलीसांनी मला मौजे वडनेर भोलजी येथे पंचनाम्याकरीता बोलविले होते, माझे समक्ष पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन ०९ देशी दारुच्या बॉटल जप्त केल्या व त्याचा पंचनामा तयार करुन तो मला वाचुन दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली.''

५) पंच साक्षीदार हा सरकारपक्षास सहाय करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाचे परवानगीने साक्षीदाराला उलटतपासात विचारता येतील असे प्रश्न विचारले. परंतु पंच साक्षीदाराने ''दि.२०/१२/२०२५ रोजी पोलीसांनी त्याला मौजे वडनेर भोलजी येथे पंचनाम्याकरीता बोलविले होते, त्याचे समक्ष पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन ०९ देशी दारुच्या बॉटल जप्त केल्या व त्याचा पंचनामा तयार करुन तो त्याला वाचुन दाखविला व त्यानंतर त्याने त्यावर सही केली'' यासर्व बाबी नाकारल्या आहेत.

६) प्रस्तुत प्रकरणामध्ये वरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, पंच साक्षीदाराने कुठल्याही प्रकारे सरकार पक्षाच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. त्यामुळे, जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. तसेच, तथाकथीत रासायनिक विश्लेषण करीता काढलेला नमुना कुठल्या तारखेला प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आला व त्यासाठी वाहक म्हणुन कोणाची नेमणुक केली होती याबाबत दोषारोपपत्रामध्ये नमुद नाही, व त्याचे बयाण पोलीसांनी नोंदविल्याबाबत दिसुन येत नाही. त्यामुळे, वाहकाचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. मला याठिकाणी नमुद करावेसे वाटते कि, फिर्यादी तथा तपासीक अंमलदार ह्याने जप्ती पंचनामा करणे अगोदर त्याचा व त्याचे सोबत असलेल्या इतर व्यक्तींचा अंगझडती पंचनामा तयार केल्याचे दिसुन येत नाही. तसेच, तपासीक अमंलदार याने रासायनिक विश्लेषण अहवाल अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे, दोषारोप पत्रामध्ये दर्शविलेली तथाकथीत जप्ती कोणाजवळुन व कुठल्या प्रकारचे द्रव्य जप्त केलेले होते याबाबत सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. एकंदरीत, वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, सरकार पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलले आरोप हे निःसंशयपणे तथा संशयाच्या परिघाच्या पलीकडे जावून सिध्द केलेले नाही. त्यामुळे, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर **नकारार्थी** नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करीताः–**

**(७)** मुद्दा क्र.१ चे उत्तर पाहता आरोपी ही कलम ६५ (ई) महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा, १९४९ या गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. दोषारोपपत्राप्रमाणे जप्त मुद्देमाल अपील कालावधी संपल्यानंतर विल्हेवाट लावण्याकरीता राज्य उत्पादन शुल्क विभाग, मलकापुर, जि.बुलढाणा यांचेकडे पाठविणे उचित होईल. त्यामुळे, मी मुद्दा क्र.२ च्या उत्तराकरीता खालील प्रमाणे अंतीम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी **प्रकाश भिमराव चव्हाण** यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम २७८(१) अन्वये महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा, १९४९, कलम ६५ (ई) या दंडनीय अपराधातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम ४८१ च्या तरतुदीनुसार वरिष्ठ न्यायालयातील अपीलमध्ये किंवा न्यायनिर्णय विरुध्द याचीकेमध्ये नोटीस मिळाल्यावर हजर राहण्याकरीता आरोपीने पुढील सहा महिन्यापर्यंत कायम राहील असा रुपये १०,०००/–(दहा हजार) चे वैयक्तिक बंधपत्र दाखल करावे.

४. प्रकरणामध्ये जप्त असलेला मुद्देमाल अपील कालावधी संपल्यानंतर विल्हेवाट लावण्याकरीता राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, मलकापुर, जि. बुलढाणा यांचेकडे पाठविण्यात यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

LUNGE KIRAN VITTHAL
Digitally signed by LUNGE KIRAN VITTHAL
Date: 2026.08.10 18:06:47 +0530

**दिनांक–१०/०८/२०२६** **(किरण वि. लुंगे )**

**ठिकाण– नांदुरा** न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

नांदुरा, जि.बुलडाणा